# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 14/02/2024 (बुधवार) सायंकाळ

---

## उमरेड येथील जुगार अड्डयावर धाड

## —: नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई :—

दिनांक १३/०२/२०२४ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक उमरेड उपविभागात गस्त करीत असतांना पोलीस स्टेशन उमरेड हद्दीत काही इसम हे तासपत्त्यांवर पैशांची बाजु लावुन काही इसम अवैधरित्या जुगाराचा पैशाचा हारजीतचा खेळ खेळत असल्याचे गोपनिय माहीती पथकास प्राप्त झाले वरून सदर पथकाने मौजा ईतवारीपेठ शेषराव हॉटेल येथे सापळा रचुन छापा टाकुन एकुण २ जुगारी इसम नामे — १) सचिन शितल शिवनकर, वय ३७ वर्ष जोगीठाणपेठ उमरेड याचे ताब्यातून सटटापटटीचे आकडे लिहलेला कागदी पान एक निळया रंगाचा पेन किमली ०५ रू अंगझडतीतुन नगदी ३१३५ रू चा असा एकुण ३१४०/—रू. चा मुदेमाल जप्त करण्यात आला. तसेच आरोपी २) काशीनाथ सुरेश नागपूरकर, वय ३६ वर्ष रा जोगीठापेठ उमरेड यांना ताब्यात घेवुन त्यांचे ताब्यातुन सटटापटटीचे आकडे लिहलेला कागदी पान एक निळया रंगाचा पेन किमली ०५ रू अंगझडतीतुन नगदी ३२६५ रू असा एकुण ३२७० रू चा मुदेमाल जप्त करून आरोपीं विरूध्द पोलीस ठाणे उमरेड येथे कलम १२ अ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

पोस्टे उमरेड येथील स्टाफ यांनी पोलीस स्टेशन उमरेड हद्दीतील ईतवारीपेठ मेन मार्केट दुर्गा स्टेज जवळ अवैधरित्या जुगाराचा पैशाचा हारजीतचा खेळ खेळणारे २ जुगारी इसम नामे — मनिष जगदीस कांबळे, वय ४० वर्ष रा मांग मोहल्ला मंगळवारीपेठ उमरेड याचे ताब्यातून एक निळया रंगाचा पेन किमती ०५ रू सटटापटटीचे आकडे लिहलेला कागदी पान अंगझडतीतुन नगदी १५३० रू असा एकुण १५३५ रू चा मुदेमाल जप्त केला असुन आरोपी विशाल दिलीप बावने, वय ३६ वर्ष रा मांग मोहल्ला मंगळवारीपेठ उमरेड एक निळया रंगाचा पेन किमती ०५ रू सटटापटटीचे आकडे लिहलेला कागदी पान अंगझडतीतुन नगदी १०१० रू असा एकुण १०१५ रू चा मुद्देमाल जप्त करून आरोपीं विरूध्द पोलीस ठाणे उमरेड येथे कलम १२ अ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर